## निवडक

### हरमल येथे १८ रोजी 'जसे करावे, तसे भरावे' नाटक

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १७ :** येथील ग्रामदैवत श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानच्या २६ व्या वर्धापनदिन सोहळ्यात मंगळवार दि. १८ रोजी रात्री ९.३० वाजता 'जसे करावे तसे भरावे नाटक हरमल देऊळवाडा श्री देव रवळनाथ प्रांगणात होणार आहे.

सदर नाटक श्री रवळनाथ दशावतारी नाट्य मंडळ देऊळवाडा सादर करणार आहेत.ह्या नाटकात वासुदेव पार्सेकर, शिवा नाईक, यशवंत अश्वेकर, संतोष गावकर, अजित ठाकूर, शिवा तोरसकर, सुरेश घाडी, संतोष नाईक व बाळा नाईक यांच्या भूमिका तसेच शैलेश सावंत (हार्मोनियम), प्रमोद घावनळकर (मृदुंगमणी), साहिल गावकर (तालरक्षक), संजय जोशी (रंगभूषा) यांची साथ असल्याचे मालक वासुदेव पार्सेकर यांनी सांगितले. सदर नाटकास समु वायंगणकर, यश विर्नोडकर, संदीप केपकर, भिवा शेगडे व विश्वास नाईक यांचे आर्थिक सहकार्य मिळाले आहे. तरी भाविक व नाट्य प्रेमींनी उपस्थित राहावे असे आवाहन दशावतार मंडळाचे मालक पार्सेकर यांनी केले आहे.

---

### शिवजयंती निमित्त खोलपेवाडी येथे उद्या 'शिवस्मरण नाटक'

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. १७ :** खोलपेवाडी साळ येथील छत्रपती शिवाजी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळातर्फे शिवजयंती निमित्त बुधवार दि. १९ रोजी संध्याकाळी ७ वाजता खोलपेवाडी येथील श्री केळेश्वर मंदिराच्या सभामंडपात सरकारी प्राथमिक विद्यालय - पुनर्वसन साळ निर्मित शिवस्मरण या नाटकाचा दुसरा प्रयोग सादर करण्यात येणार आहे.

कर्तृत्व, नेतृत्व आणि दातृत्व अशा अष्टपैलू जीवनाची प्रेरणा स्त्रोत छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित हा नाट्यप्रयोगात ८५ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या नाट्यप्रयोगात प्रामुख्याने शिवजन्म, रायरेश्वर शपथ, अफजलखान वध, पावनखिंडीतील बलिदान, तानाजी मालुसरे यांचे शौर्य, हिरकणीचे धाडस, शिवराज्याभिषेक यांसारख्या महत्वाच्या प्रसंगांचे प्रभावीपणे सादरीकरण केले आहे. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास व जोशपूर्ण भूमिका साकारल्या विशेषतः तलवारबाजी, पाठांतरातून संवादफेक आणि उत्तम पार्श्वसंगीत यांमुळे हे नाटक प्रभावीठरले आहे.

मुख्याध्यापक धाकटू पाटील, शिक्षक संकेत नाईक, शिक्षिका स्मिता राऊळ व सुवर्णा गावकर यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले तसेच हर्षदा नाईक, स्नेहल शेट्ये, ओवी सुतार या पालकांनी विशेष श्रम घेतले. तरी या विद्यार्थी बालकलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी आपण रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे छत्रपती शिवाजी कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळातर्फे आवाहन केले आहे.

---

### शिवजयंतीनिमित्त उद्या काणकोण येथे शिवस्मारक क्लबतर्फे भरगच्च कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** चावडी, काणकोण येथे शिवजयंती निमित्त दि. १९ रोजी, शिवस्मारक सांस्कृतिक आणि क्रीडा क्लबतर्फे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवस्मारक सांस्कृतिक आणि क्रीडा क्लब, चावडी, काणकोण यांच्या वतीने शिवजयंती निमित्त दि. १९ रोजी, विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. या कार्यक्रमाचा सर्व शिवप्रेमी, हितचिंतक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

सकाळी ९.३० वाजता शिवस्मारक चावडी कदंब बस स्थानक याठिकाणी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीस अभिषेक, शिवज्योत व पूजन आणि तीर्थ प्रसाद वितरण होईल.

सकाळी १० वाजता श्री शिवरायांच्या मिरवणूकीस सुरुवात होईल. ती पुढे नगर्से, चार-रस्ता, क्लियोपात्रा, सावंतवाडा, सकाळी ११.१५ वाजता देवगी पुरूष सभागृह पाटणे येथे पोहचेल. त्यानंतर पाटणे जंक्शन, पणसुले व दुपारी १२ वाजता चावडी तर १२.१५ वाजता मिस्तिमळ जंक्शन,१२.२५ वाजता देळें, १२.३५ वाजता खालवडे जंक्शन, १.४५ वाजता श्रीस्थळ पंचायत, तर १ वाजता श्री मल्लिकार्जुन देवस्थान येथे पोहचणार आहे.

३ वाजता शिवजयंती निमित्त रविंद्र भवन चावडी येथे वेषभूषा स्पर्धा कनिष्ठ गट (३ते १० वर्षे) व वरिष्ठ गट (१० ते १६) अशा गटात होईल. प्रथम पारितोषिक रु. २ हजार द्वितीय १५००, तृतीय रु. १००० हजार व २ उत्तेजनार्थ बक्षिसे, प्रत्येक गटासाठी बक्षिसे असतील.

सायंकाळी ६ वाजता शिवजयंती सोहळा व बक्षिस वितरण समारंभाला काणकोणचे आमदार व राज्याचे सभापती रमेश तवडकर प्रमुख पाहुणे म्हणून तर नगराध्यक्षा सारा देसाई, नगरसेवक रमाकांत नाईक गावकर, हेमंत नाईक गावकर, चावडी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष दीपक नाईक गावकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित रहाणार आहेत, असे आयोजन अध्यक्ष सुदर्शन संतोष देसाई यांनी सांगितले.

संध्याकाळी ७ वाजता सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, चावडी आणि शिवस्मारक सांस्कृतिक व क्रीडा मंडळ, चावडी यांच्या संयुक्तविद्यमाने लता मंगेशकर कलांगणातील संजय बांदेकर सभागृहात गजांतलक्ष्मी स्पोर्टस अँड कल्चरल क्लब ,वळवई फोंडा प्रस्तुत व विठ्ठल नागेश पारवाडकर लिखित, हेमचंद्र नारायण तारी दिग्दर्शीत, ऐतिहासिक नाटक स्वराज्य सूर्य सादर केले जाईल.

---

### हरमल येथे आज नामवंत कलाकार संस्थांची नाट्य प्रवेश स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १७ :** येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आयोजित शिवजयंती उत्सव सोहळ्यानिमित्त पेडणे तालुका मर्यादित नाट्यप्रवेश स्पर्धा मंगळवार १८ रोजी संध्या ३.३० वाजता गणेशोत्सव सभागृहात होणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी दिली. या स्पर्धेत पाच संस्थांना प्रवेश दिला आहे. यात ओमकार थिएटर्स प्रस्तुत अॅड. अमित सावंत निर्मित रायगडाला जेव्हा जाग येते. श्री राष्ट्रोळी कलावैभव हरमलतर्फे शंभूराजे,पद्मस्पर्श नाटयसंघ पेडणे तर्फे रायगडाला जेव्हा जाग येते', श्री देवी भगवती क्रीडा व सांस्कृतिक संघ,पेडणेतर्फे व रंगनाथ कलशांवकर निर्मित 'तो मृत्युंजय एक' व दुर्वांकुर कला केंद्रतर्फे इथे ओशाळला मृत्यू' नाट्यप्रवेश सादर केले जातील.

या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संध्या ३ वाजता प्रमुख पाहुणे निवृत्त शिक्षक दादू परब व खास निमंत्रित पोलीस निरीक्षक विश्वजित चोडणकर तसेच सरपंच संतान फर्नांडिस व पंच सदस्य उपस्थित राहणार आहेत.

दरम्यान, १८ व १९ रोजी संध्या ६.३० वाजता प्रख्यात कीर्तनकार कैलास खरे, मुंबई यांचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन संघर्षावर आधारित कीर्तन होईल.

तत्पूर्वी १९ रोजी संध्या ३ वाजता हरमल मर्यादित ८ ते १६ वर्षापर्यंतच्या मुलांसाठी वेशभूषा सादरीकरण होईल,त्यात फक्त १५ मुलांना संधी दिली जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क ८८८८५५४९६६ साधावा असे कळविले आहे. यंदाची स्पर्धा अर्जुन खोर्जे ,योगेश कोरकण कर,राजन नानोस्कर,मनोज कोरकणकर,दत्ताराम भाऊ पेडणेकर,माजी सरपंच,विद्यमान पंच रजनी इब्रामपुरकर,पंच सुशांत गावडे, उदय बाबुसो वायंगणकर यांनी श्रीमती चंद्रावती (आई), श्रीमती वत्सला वायंगणकर(आत्या) स्मरणार्थ, नितीन कुडव, प्रकाश दाभोलकर, भाऊ बर्डे यांनी पुरस्कृत केली आहे.

दरम्यान, पेडण्यातील नामवंत कलाकारांचा, ऐतिहासिक अभिनय पाहण्याची संधी संस्थेने उपलब्ध केली असून, तालुक्यातील नाट्य प्रेमींनी उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्ष संतोष कोरकणकर यांनी दिली. यावेळी उपाध्यक्ष सुखानंद नाईक, रंगनाथ नाईक, सचिव चंद्रहास दाभोलकर, उपसचिव दत्तराज गावडे, खजिनदार भाऊ गडेकर, उपखजिनदार राघोबा गावडे, आश्विन वायंगणकर उपस्थित होते.

---

# चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी भारतीय संघाचा सराव सुरू

## पहिला सामना २० रोजी भारत-बांगलादेश खेळणार

**दुबई, दि. १७ :**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या आधी भारतीय संघाने सराव सुरू केला आहे. रविवारी दुबईतील आयसीसी अकादमीमध्ये संघाने कठोर परिश्रम केले. या स्पर्धेत संघाचा पहिला सामना २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशविरुद्ध होईल. बीसीसीआयने संघाच्या सरावाचे व्हिडिओ आणि फोटो शेअर केले आहेत. पीटीआयच्या वृत्तानुसार, सरावादरम्यान हार्दिक पंड्याच्या चेंडूने यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतला दुखापत झाली.




सराव सत्रादरम्यान पंतला गुडघ्याला दुखापत झाली. हार्दिकचा एक फटका पंतच्या डाव्या गुडघ्याला लागला. त्याला प्रचंड वेदना होत्या, पण फिजिओ कमलेश जैन यांनी लगेच त्याच्यावर उपचार केले. यानंतर, हार्दिक त्याच्या प्रकृतीची माहिती घेण्यासाठी नेटमधून बाहेर आला. पंतला सुरुवातीला वेदना होत होत्या आणि तो लंगडत चालताना दिसला. तथापि, दुखापत गंभीर नव्हती आणि फिजिओने उपचार घेतल्यानंतर, पंतने ताबडतोब त्याचे पॅड घातले आणि फलंदाजीसाठी नेटमध्ये आला.

भारताचा पहिला सामना २० रोजी बांगलादेशविरुद्ध आहे

भारतीय संघ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये आपला पहिला सामना बांगलादेशविरुद्ध खेळणार आहे. हा सामना २० फेब्रुवारी रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जाईल. संघाचा दुसरा सामना २३ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानविरुद्ध आणि तिसरा सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडविरुद्ध असेल.

भारताला पाकिस्तान, बांगलादेश आणि न्यूझीलंडसह अ गटात स्थान देण्यात आले आहे. स्पर्धेचे दोन उपांत्य सामने ४ आणि ५ मार्च रोजी होतील. अंतिम सामना ९ मार्च रोजी खेळवला जाईल.

चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडिया

रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), ऋषभ पंत (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, हर्षित राणा, मोहम्मद शमी, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव.

राखीव खेळाडू: यशस्वी जयस्वाल, मोहम्मद सिराज आणि शिवम दुबे.

---

# मिचेल स्टार्क चॅम्पियन ट्रॉफीमधून बाहेर




**नवी दिल्ली, दि. १७ :**

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ पूर्वी ऑस्ट्रेलियन संघाला आणखी एक धक्का बसला आहे. स्टार वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कने वैयक्तिक कारणांमुळे या स्पर्धेतून आपले नाव मागे घेतले. आता ऑस्ट्रेलियन संघ त्यांच्या तीन सर्वोत्तम गोलंदाजांशिवाय चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये उतरणार आहे.

कर्णधार पॅट कमिन्स आणि जोश हेझलवूड आधीच स्पर्धेतून बाहेर पडले होते. पॅट कमिन्स घोट्याच्या दुखापतीतून बरा होऊ शकला नाही. २०२४-२५ च्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफी दरम्यान कमिन्सलाही या समस्येचा त्रास झाला होता. तर हेझलवुडला कंबरेचा त्रास होता. याशिवाय, मिचेल मार्शला दुखापतीमुळे आधीच बाहेर ठेवण्यात आले आहे. तर मार्कस स्टोइनिसने अचानक एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली. याचा अर्थ ऑस्ट्रेलियन संघाला चॅम्पियन्स ट्रॉफी संघात एकूण पाच बदल करावे लागले आहेत.

कांगारुंच्या संघामध्ये शॉन अॅबॉट, बेन द्वारशुइस, स्पेन्सर जॉन्सन, जेक-फ्रेसर मॅकगर्क आणि तनवीर संघा यांना चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी ऑस्ट्रेलियन संघात स्थान देण्यात आले आहे. शॉन अॅबॉट, बेन द्वारशुइस आणि स्पेन्सर जॉन्सन हे वेगवान गोलंदाज आहेत. तन्वीर संघा हा भारतीय वंशाचा लेग स्पिनर आहे, फ्रेझर-मॅकगर्क हा एक सलामीवीर फलंदाज आहे. दुसरीकडे, २१ वर्षीय फिरकी गोलंदाज अष्टपैलू कूपर कॉनोलीला प्रवासी राखीव संघात स्थान देण्यात आले आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये स्टीव्ह स्मिथ ऑस्ट्रेलियन संघाचे नेतृत्व करेल.

**ऑस्ट्रेलियाचा सुधारित संघ**

स्टीव्ह स्मिथ (कर्णधार), शॉन अॅबॉट, अॅलेक्स केरी, बेन द्वारशुइस, नॅथन एलिस, जेक फ्रेझर-मॅकगर्क, आरोन हार्डी, ट्रॅव्हिस हेड, जोश इंग्लिस, स्पेन्सर जॉन्सन, मार्नस लाबुशेन, ग्लेन मॅक्सवेल, तन्वीर संघा, मॅथ्यू शॉर्ट, अॅडम झांप्पा

---

# गुजरात जायंट्सचा ऐतिहासिक विजय

## यूपी वॉरियर्सविरुद्ध लक्ष्याचा पाठलाग करत नोंदवला विजय

**वडोदरा, दि. १७ :**

वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या डब्ल्यूपीएल २०२५ च्या तिसऱ्या सामन्या गुजरात जायंट्सने ऐतिहासिका विजय नोंदवला. गुजरात जायटंस्ने प्रथमच लक्ष्याचा पाठलाग करताना विजय मिळवला. गुजरात जायंट्सने यूपी वॉरियर्सविरुद्ध ६ विकेट्सनी दणदणीत विजय नोंदवला. या सामन्यात उत्तर प्रदेशने प्रथम फलंदाजी करत १४३ धावा केल्या. प्रत्युत्तरात, गुजरात संघाने १२ चेंडू शिल्लक असताना ६ विकेट्सने सामना जिंकला.

गुजरातच्या विजयात सर्वात मोठे आणि महत्त्वाचे योगदान कर्णधार अॅशले गार्डनरचे होते, जिने फलंदाजीत ५२ धावा केल्या आणि गोलंदाजीतही २ विकेट्स घेतल्या. यासह गुजरात जायंट्सने लक्ष्याचा पाठलाग करताना पहिल्यांदाच विजयावर शिक्कामोर्तब केला. या सामन्यात गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. कर्णधार अॅशले गार्डनरचा हा निर्णयही बरोबर ठरला.



गुजरातच्या घातक गोलंदाजीसमोर, यूपी वॉरियर्सने ७८ धावांपर्यंत ५ विकेट गमावल्या होत्या. यानंतर कर्णधार दीप्ती शर्मा आणि उमा छेत्री यांच्या २४ धावांच्या खेळीमुळे उत्तर प्रदेश संघाने कसा तरी १४३ धावांचा टप्पा गाठला. गुजरातकडून गोलंदाजी करताना प्रिया मिश्राने कहर केला आणि ३ बळी घेतले. यानंतर १४४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, गुजरात जायंट्सची सुरुवात खराब झाली. कारण बेथ मुनी आणि दयालन हेमलता यांनी २ धावांच्या आतच आपले विकेट गमावले.

---

# माशे, काणकोण येथे हिंदी शिक्षकांसाठी कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** माशे, काणकोण येथील सत्यवती सोयरु आंगले उच्च माध्यमिक विद्यालय आणि सुपर स्कुल कॉम्लेक्स माशें, यांच्या संयुक्त विद्यमाने काणकोण तालुक्यातील हिंदी शिक्षकांसाठी एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून काणकोण तालुका भागशिक्षण अधिकारी गणेश गावडे उपस्थित होते. तसेच सत्र मार्गदर्शक म्हणून मडगावच्या पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाचे हिंदी विषयाचे सहायक प्राध्यापक प्रदीप जटाळ आणि सत्यवती सोयरू आंगले उच्च माध्यमिक विद्यालयाचे आयसीटी शिक्षक सुधीर पै उपस्थित होते.

प्राचार्य हेमंत कामत यांनी स्वागत व प्रस्ताविक केले. शिक्षिका तृप्ती आजगावकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. गणेश गावडे यांनी वाचनापासून दूर जाणाऱ्या विद्यार्थ्यांविषयी चिंता व्यक्त करतानाच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रोत्साहित करावे, असे प्रतिपादन केले.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात डॉ. प्रदीप जटाळ हाणी हिंदी भाषा आनी अध्यापन कौशल्य या विषयावर मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या सत्रात सुधीर पै यांनी ई-लर्नींग आनी हिंदी भाषा अध्यापन कौशल्य हया विषयावर मार्गदर्शन केले.



**माशे : हिंदी कार्यशाळेचे उद्घाटन करताना डॉ. प्रदीप जटाळ, गणेश गावडे, प्रा. हेमंत कामत, सुधीर पै व तृप्ती प्रभू आजगावकर.**

हिंदी दिनाच्या निमित्ताने घेतलेल्या विविध स्पर्धाचें बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. सहभागी शिक्षकांना प्रशस्तीपत्रे देण्यात आली. सहभागी शिक्षकांच्या वतीने योगिता महाले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यशाळेत ३३ शिक्षक सहभागी झाले होते. या कार्यशाळेच्या विविध सत्रांचे सूत्रसंचालन विणा प्रभुगावकर व संकेत वारीक यांनी केले. कार्यशाळेची समन्वयक तृप्ती प्रभु आजगांवकर यांन आभार प्रदर्शन केले.

---

# कला अकादमीत 'चित्रलतिका' चित्रप्रदर्शन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १७ :** लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड व एशिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये ज्यांचे नाव आहे, असे जबलपूर येथील प्रतिभावान चित्रकार रामकृपाल नामदेव यांनी भारतरत्न लतादीदी मंगेशकर यांच्या व्यक्तिचित्रांवर 'चित्रलतिका' हे आपले १९ वे वेधक चित्रप्रदर्शन कला अकादमी गोवाच्या कला दालनात भरविले आहे.

लतादीदींच्या विविध रूपे, भावमुद्रा त्यांनी विलक्षणरित्या टिपली आहेत. लतादीदींच्या ४० व्यक्तिचित्रे एकत्र पाहणे हा आगळा आनंदानुभव या प्रदर्शनातून मिळत आहे. गणपतीची व सरस्वतीची पूजा करताना, रियाज करतांना, भावंडांबरोबर, सचिन तेंडुलकरशी गप्पा मारत असताना, सेनापती बापट यांच्याबरोबर चालताना, पंडित नेहरु यांच्या शेजारी उभी राहून ये मेरे वतन के लोगो... गाताना, अशी लतादीदिच्या भावमुद्रा न्याहाळताना मन सुखावते व मेरी आवाजही पेहचान है... च्या ओळी कानात रुंजी घालतात. रामकृपाल नामदेव हे लौकिकार्थाने चित्रकलेचे विद्यार्थी



**लता दीदींच्या विविध भावमुद्रा**

नाहीत परंतु लहानपणापासून त्यांच्यातील अंगीभूत कला गुण त्यांनी विकसित केले. भगवान दास हे त्यांचे प्रेरणास्थान. आज लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड पर्यंत त्यांनी मजल मारली आहे यावरून त्यांच्यातील प्रतिभेची प्रचिती यावी. त्यांनी हे प्रदर्शन हिरालाल राय कला भवन, जबलपूर मध्ये सहा वेळा, तसेच मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत, मुंबईच्या पु.ल. देशपांडे अकादमीत सात वेळा, कोलकाता येथील जामनी राय आर्ट गॅलरीत, गुजरात येथील रविशंकर रावल कला भवनात (ललित कला अकादमी), ललित कला अकादमी, नवी दिल्ली अशा प्रतिष्ठेच्या ठिकाणी भरविली आहेत.

लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये सन्मान मिळालेल्या त्यांच्या लता दीदींवरील चित्रात ९३० सूक्ष्म व्यक्तिचित्रे आहेत, पैकी लता दीदींची २९९, जगातील नामवंत महिलांची ६३० व एक सरस्वतीचे आहे. एशिया व इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मधील लता दीदींच्या चित्रात २४३६ दीदींचे सूक्ष्म चेहरे आहेत तर एका चित्रात ४३५८ दीदींचे चेहरे आहेत.

हे प्रदर्शन २० फेब्रुवारी पर्यंत सकाळी १० ते रात्री ९ पर्यंत रसिकांसाठी खुले आहे. गोवा विधानसभेचे सभापती डॉ. रमेश तवडकर यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी नम्रता उलमान (विधानसभा मुख्य सचिव), मनुजा गावकर (दक्षिण गोवा भाजप सरचिटणीस), दत्ता नाईक, विनय रोहाणी, कपिल गोयल उपस्थित होते. साक्षी देशपांडे यांनी सरस्वती वंदना म्हटली. चित्रकार रामकृपाल नामदेव व अंजू नामदेव यांनी स्वागत केले.

---

# 'बलराम'च्या विद्यार्थ्यांनी फुलवली टोमॅटो, फुलकोबीची बाग



■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. १७ :** आमोणे, पैंगीण येथील बलराम निवासी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात सेंद्रिय शेती या उपक्रमाद्वारे भाजीपाल्याचा मळा फुलवला आहे. त्यात टोमॅटो, कोबी, फुलकोबी, वांगी, भेंडी, ढब्बू मिरची, तांबडी भाजी अशा विविध प्रकारच्या भाज्यांचा समावेश आहे.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांना शुद्ध अन्न कसं पिकवलं जातं आणि शेतमालाचे उत्पादन घेताना किती कष्ट पडतात हे समजण्यास मदत होते. पर्यावरणाशी नातं जोडणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने राबविला आहे.

विद्यार्थ्यांना शाळेमध्ये कृषी विषयाला जोडूनच फलोत्पादन हा विषय शिकवला जातो. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भाजी मळ्यात कुठलीही रासायनिक खते न वापरता पालापाचोळा, शेण या नैसर्गिक घटकांचा वापर केला आहे. या उपक्रमातील सर्व कामे विद्यार्थ्यांनीच केली आहेत. शेतीची मशागत करणे, पिकाला पाणी देणे, भाज्या तयार झाल्यावर त्या काढणे या सर्व टप्प्यातून जाण्याचा एक वेगळाच अनुभव विद्यार्थ्यांना मिळतो. विद्यार्थ्यांचं मातीशी नातं जोडणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. हा उपक्रम दरवर्षी शाळेत राबविण्यात येतो. हा तयार भाजीपाला विद्यार्थ्यांच्या जेवणात वापरतात. मुख्याध्यापिका सविता तवडकर यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. तसेच शिक्षक मधुकर वेळीप, अक्षय गावकर व इतर कर्मचारी वर्गाचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६६ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल - १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 166 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .